# संत गाडगे महाराज यांचे सामाजिक कार्य : एक संशोधन

सचिन रा. मेश्राम
सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग
भिवापूर महाविद्यालय भिवापूर, नागपूर
**Email – sachinmeshram329@gmail.com**
**9637167883**

================================================================================

सारांश:

संत गाडगे महाराज (१८७६-१९५६) हे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि नैतिक परिवर्तनाचे अग्रदूत मानले जातात. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता समाजातील दैन्य, अज्ञान, अंधश्रद्धा आणि असमानता यांचा नाश करून स्वच्छतेचा, श्रमसंस्कृतीचा व शिक्षणाचा प्रसार करणे. संशोधनाच्या दृष्टीने पाहिल्यास, गाडगे महाराजांचे कार्य पारंपरिक संतविचारापेक्षा व्यावहारिक सामाजिक सुधारणा आणि मानवतावादी कृतीवर अधिक आधारित होते. त्यांनी प्रवचन, भजन, कीर्तन यांसारख्या सांस्कृतिक साधनांचा वापर समाजजागृतीसाठी केला, परंतु त्यांचे मुख्य योगदान प्रत्यक्ष कृतीतून दिसते—गावोगाव फिरून त्यांनी रस्ते, विहिरी, स्मशानभूमी, धर्मशाळा व शाळांची उभारणी केली.

अस्पृश्यता, जातीभेद आणि धार्मिक आडाखे यांवर त्यांची तीव्र टीका होती. त्यांच्या मते "धर्म म्हणजे माणुसकी" आणि "सेवा हीच उपासना" हे विचार सामाजिक सुधारणा चळवळीचे वैचारिक आधारस्तंभ ठरतात. संशोधनातून दिसते की गाडगे महाराजांनी समाजातील संसाधनांचे समतोल वापर आणि लोकसहभागावर भर दिला. समाजकार्यात त्यांनी दानधर्म स्वीकारला नाही, तर श्रमदान व जबाबदारीची संस्कृती बिंबवली. त्यामुळे त्यांच्या चळवळीला वर्णनात्मक स्वरूपापेक्षा क्रियात्मक आणि जनसहभागी मूल्य मिळाले.

स्वच्छतेच्या मोहिमांद्वारे त्यांनी सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणजागर यांची पायाभरणी केली; हे कार्य आजच्या स्वच्छ भारत अभियानाच्या मूल्यांशी साम्य दर्शवते. अभ्यासातून असेही दिसून येते की त्यांच्या कीर्तनांमध्ये सामाजिक संदेश, विवेकवाद आणि शिक्षणाची आवश्यकता यांचे सातत्याने प्रतिपादन केले जाते. त्यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या शैक्षणिक संस्था, वसतिगृहे आणि धर्मशाळा आजही त्यांच्या सेवाभावाच्या वारशाचे साक्षीदार आहेत.

अशा प्रकारे, संत गाडगे महाराजांचे सामाजिक कार्य हे फक्त आध्यात्मिक उपदेश नसून प्रत्येक कृतीतून समाजपरिवर्तन घडविणारी एक सशक्त प्रयोगशील चळवळ होती. त्यांच्या कार्याचा अभ्यास आधुनिक सामाजिक सुधारणा, जनसहभाग आणि मानवतावादी मूल्यांच्या दृष्टीने आजही संदर्भयोग्य ठरतो

प्रास्ताविक :

भारतीय समाजसुधारणेच्या दीर्घ परंपरेत संत चळवळीने समाजमनाला नैतिकता, मानवता आणि कर्तृत्वाची दिशा दिली आहे. या परंपरेत संत गाडगे महाराज (१८७६-१९५६) हे एक असामान्य, लोकाभिमुख आणि कृतीशील व्यक्तिमत्त्व म्हणून उभे राहतात. त्यांनी केवळ उपदेश न करता प्रत्यक्ष कृतीद्वारे समाजपरिवर्तनाची वाट चोखाळली. स्वच्छता, शिक्षण, श्रमसंस्कार, परोपकार आणि सामाजिक न्याय ही त्यांच्या कार्याची केंद्रस्थाने होती. ग्रामीण भागातील अज्ञान, दारिद्र्य, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांविरुद्ध त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला.

संत गाडगे महाराजांची कार्यपद्धती अत्यंत साधी, पण परिणामकारक होती. कीर्तन, भजन आणि लोकभाषेतील उपदेश यांद्वारे त्यांनी जनजागृती केली; तर श्रमदान, स्वच्छता मोहिमा आणि सेवा कार्यांमधून आदर्श कृतीचे दर्शन घडवले. त्यांनी मंदिर, धर्मशाळा किंवा दानधर्म यांपुरते कार्य मर्यादित न ठेवता समाजातील उपेक्षित घटकांसाठी शिक्षण, आरोग्य आणि स्वावलंबन यांचा पुरस्कार केला. दलित, गरीब, शोषित आणि वंचित समाजघटकांच्या उन्नतीसाठी त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि रूढीपरंपरांना आव्हान दिले.

संत गाडगे महाराज यांच्या समाजकारणाचा समग्र अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या विचारांची तात्त्विक पार्श्वभूमी, कार्याची पद्धत, त्यातून निर्माण झालेली सामाजिक चळवळ आणि समाजावर झालेला दूरगामी परिणाम यांचा विश्लेषणात्मक आढावा येथे घेतला आहे. तसेच, आजच्या बदलत्या सामाजिक संदर्भात त्यांच्या विचारांची उपयुक्तता, स्वच्छता व सामाजिक जबाबदारीसारख्या प्रश्नांवर त्यांचे मार्गदर्शन किती समर्पक आहे, याचाही विचार करण्यात आला आहे. संत गाडगे महाराजांचे जीवनकार्य हे केवळ ऐतिहासिक वारसा नसून, समकालीन समाजासाठी प्रेरणादायी दिशादर्शक आहे—हीच भूमिका या प्रस्ताविकेच्या केंद्रस्थानी आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :

1 .संत गाडगे महाराज यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे

2.भारताच्या ग्रामीण समाजावर त्यांच्या कार्याचा प्रभाव शोधणे

3.स्वच्छता, शिक्षण, अंधश्रद्धा निर्मूलन या कार्यांची परिणामकारकता विश्लेषित करणे

4.त्यांच्या कार्यपद्धतीचा आजच्या सामाजिक कार्यात उपयोगिता तपासणे

संशोधनाची पद्धत :

प्राथमिक आणि दुय्यम स्रोतांचा अभ्यास करून गुणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला. चरित्र, लेख, ग्रंथ, समाजशास्त्रीय अध्ययन व संशोधनात्मक निबंध यांचा आधार घेत विश्लेषण करण्यात आले.

संत गाडगे महाराज : जीवन आणि समाजिक पार्श्वभूमी

शेणगाव या गावी परीट जातीत संत गाडगे महाराज यांचा जन्म झाला. त्यांच्या आईचे नाव सखुबाई तर वडिलांचे नाव सते. झिंगराजी हे दारूच्या व्यसनात पूर्णपणे बुडालेले होते. त्यांना ६-७ एकर जमीन होती. ती जमीन त्यांनी यांचा जन्म अमरावती व्यसनापोटी विकून टाकली होती. घरही विकले, त्यानंतर हे गाडगे महाराजांचे लहानपणाचे नाव. डेबूजी नांगरणी, कुळवणी, पेरणी ही कामे शिकला. शेतीकामात डेबूजी हे कुटुंब मामाच्या आश्रयास गेले. डेबूजी हे श्रीसंत प्रवीण झाला. लग्न जमविणे, साखरपुड्याचे कार्यक्रम, कुणाची लेक नांदत नसेल तर मध्यस्थी करणे वगैरे कामातही तो लक्ष घालू लागला. करीत होता. . त्याला स्वतःचे शेत नव्हते. घर नव्हते. त्यामुळे त्याचे लग्न जमण्यात अडचणी येत. पण शेवटी खेडयांत त्याचे नाव झाले. डेबूजी कंताबाई या मुलीशी (वय ७-८) त्यांचा विवाह झाला. सावकाराच्या कर्जापोटी दडपण येऊन त्यांच्या मामाचे शेतावर कष्ट निधन झाले. शेणगाव, कोतेगाव, दापुरा या गावी त्यांचे लहानपण गेले.

काम, क्रोध, अहंकार इत्यादींवर त्यांनी विजयच मिळवला होता. ते पूर्णपणे निरिच्छ व ममत्वशून्य झाले होते. ते. १ मे १९२३ ला त्यांची आई वारली, पण अंत्यविधीला ते हजर राहिले नाहीत. रक्षाविसर्जन करावयाला ते गेले नाहीत. ते सुख-दुःखाच्या पलीकडे गेले होते. त्यांचा एकुलता एक मुलगा गोविंद कुत्रा चावून मृत्यू पावला. तो वृत्तांत ऐकून चालू कीर्तन त्यांनी तसेच पुढे चालू ठेवले. ते पूर्वीपासूनच अनासक्त होते. आसक्ती त्यांना कशाचीच नव्हती. कुटुंबातील सदस्यांनी काम करून जगावे असे ते आग्रहाने सांगत असत. श्रमसाधन, श्रमप्रतिष्ठा यावर त्यांचा भर होता. 'फुकटचे खाऊ नका' हे त्यांचा संदेश होता. त्यांच्या घरच्या लोकांनाही ते श्रमाशिवाय खाऊ देत नसत. गावोगावातून हिंडताना ज्या घरी ते जेवण करायचे त्या घरची कामे ते स्वतः करीत. बाबांना म. गांधी, डॉ. आंबेडकर, विनोबा भावे, डॉ. पंजाबराव देशमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्याबद्दल खूप आदर होता.

वृद्धाश्रम :-

वृद्धाश्रमाची कल्पना बाबांनाच प्रथम सुचली ती २० व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात. ते जेव्हा पंढरपुरास येत तेव्हा वृद्धांचे अंग पुसणे, कपडे बदलणे ही कामे करत.

सदावर्त :-

नाशिकला भिकाऱ्यांची संख्या मोठी होती. भीक मागणे त्यांचा व्यवसायच झाला होता. भिकाऱ्यांशिवाय नाशकात अपंग, आंधळी, पांगळी माणसे होती. अन्न, वस्त्र, पादत्राणे इत्यादी अभावी त्यांचे हाल होत असत. आंधळ्या व पांगळ्यांना मदत करा असे आवाहन ते कीर्तनातून करत. पंढरपुरात त्यांनी ज्या धर्मशाळा केल्या त्याच्या मागील आवारात त्यांनी दीन-अपंगांसाठी ओळीने झोपड्या बांधल्या.

धर्मशाळांची उभारणी :-

बाबांनी अनेक ठिकाणी धर्मशाळांची उभारणी केली.

१) परीट धर्मशाळा- पंढरपूर,

२) मराठा धर्मशाळा पंढरपूर.

३) श्रीक्षेत्र नाशिक धर्मशाळा,

४) आळंदी-देहू येथील धर्मशाळा, धर्मशाळा,

५) जे. जे. हॉस्पिटल धर्मशाळा, मुंबई.

६) पुणे (सोमवार पेठ) येथील पंढरपुरची धर्मशाळा दोन मजली होती. यात्रेकरूंना सामान ठेवण्यासाठी कपाटे, स्वयंपाकासाठी भांड्यांची व्यवस्था होती. गाडगे महाराजांना शिक्षणाचा गंध नव्हता; पण निरीक्षणशक्ती अफाट होती. बांधकामाची तर अत्यंत बारीकसारीक माहिती होती. वरील तीन धर्मशाळा भक्तांसाठी सोयीसुविधांनी परिपूर्ण होत्या. पंढरपूर येथील मराठा धर्मशाळेसाठी त्यांनी विश्वस्त मंडळ स्थापन केले होते. मध्यप्रदेशातही त्यांनी धर्मशाळा उभ्या केल्या. आपला कोणीही शिष्य नाही ही त्यांची प्रकट घोषणाच होती. ती त्यांनी शेकडो वेळा कीर्तनामधून उच्चारली होती. बांधकामाचे हिशेब ते अत्यंत चोखपणे ठेवत.

मूर्तिजापूर येथे गोरक्षण शाळा :-

अकोला जिल्ह्यात मूर्तिजापूर येथे गोरक्षण शाळा उभारली. शेतकरी गुरे म्हातारी झाली की ती खारा विकत. दारिद्र्यामुळे त्या म्हाताऱ्या जनावरांचे काय करावे असा मोठा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राही. गाडगे महाराज यांनी मूर्तिजापूरला अनाथ गुरांसाठी गोरक्षण शाळा काढली. त्यासाठी मूर्तिजापूरचे नानायांचे विशेष सहकार्य त्यांना लाभले.

देवासमोर प्राणी/पक्षी हत्या करण्यास श्रीसंत गाडगे महाराजांचा विरोध:-

महाराष्ट्रात महादेव, खंडोबा, बिरोबा, वेताळ, मरीआई, मातामाय, मानाई वगैरे देवतांच्या पढे सर्व क्रूर हिंसाप्रकार होते. श्रीसंत फेडण्यासाठी कोंबडी, बकरी, इकरे, रेडे यांचा बळी देण्याची प्रथा होती.

गाडगे महाराजांनी या प्रथेविरुद्ध बंड केले. आपल्या कीर्तनातून या प्रथेसंदर्भात समाजाचे प्रबोधन केले १९३०-१९५५ या २५ वर्षांच्या काळात बाबा व त्यांचे अनुयायी कीर्तनकार यांनी कीर्तने करून प्राणी विश बंद व्हावी यासाठी प्रयत्न केले. प्राण्यांशी करपणे वागाल तर ते पाप फेडावे लागेल असे भय समाजा ठेवले. त्यामुळे प्राणी हिंसा करू इच्छिणाऱ्यांवर त्याचा प्रभाव पडला. बाबांचे कीर्तन ऐकून पराहत्या करण्या लोक धजावत नसत. नगर जिल्ह्यात राहुरी तालुक्यात वरवंडी येथे मरीआईला बकरांचा बळी मोठ्या प्रमाण्यात दिला जाई. महाराष्ट्रात जेथे जेथे प्राण्यांचा बळी देण्याची प्रथा होती तेथे तेथे बाबा व त्यांच्या अनुयायांनी कीर्तने करून समाजजागृती केली व ती प्रथा बंद पाडण्याचा प्रयत्न केला. गाडगे महाराज आपल्या कीर्तनात नेहमीच आंबेडकरांच्या कार्याचा, विचार व संघर्षांचा आवर्जन उल्लेख करत. लोकांना आंबेडकरांच्या नावाच्या घोषणा द्यावयास लावत. आंबेडकरांच्या निर्वाणाची माहिती जेव्हा त्यांना मिळाली तेव्हा धायमोकलून ते रडले होते.

अस्पृश्यता निवारण :

बाबांचा जन्म परीट जातीत झाला असला तरी अस्पृश्यांना काय सोसावे लागते हे त्यांनी जवळून पाहिले होते. त्यांनी आपल्या संस्थांमधून 'अस्पृस्यता' हा शब्द काढला होता. अस्पृश्यांना सर्वांबरोबरच ते बसत. शिवाशिव रिकामटेकड्या लोकांचा उद्योग आहे असे ते म्हणत. कीर्तनात ते 'शिवाशिव' शास्त्रावर झोड उठवत. कीर्तनानंतर दुसऱ्या दिवशी जो भंडारा होई त्यात अस्पृश्यता मुळीच पाळली जात नसे. बाबांच्या महार अनुनयांमध्ये अभिमानबुवा चोखामेळा नावे एक कीर्तनकार होते. कीर्तन हे त्यांचे जीवनव्रतच होते. एकदा कोकणात कीर्तन चालू असतानाच मुलगा गोविंद मृत्यू पावल्याची तार आली तरी त्यांचे कीर्तन सुरूच ठेवले होते.

बाबांचे अनुयायी कीर्तनकार:-

बाबांचे अनुयायी म्हणून जवळजवळ १००-१४० कीर्तनकार होते. ते महाराष्ट्रभर फिरत असत. त्यात सर्व जमातीचे स्त्री-पुरुष होते. ब्राह्मण, मराठे, न्हावी, वंजारी, धनगर, सुतार, महार, मांग, ढोर, चांभार वगैरे होते. १९३०-५० या काळात त्यांच्या अनुयायांनी समाजप्रबोधनाचे मोठे काम केले. राजारामबुवा कैकाडी व किशन तनपुरे या त्यांच्या अनुयायांनी अंगच्या कर्तृत्वाने अपूर्व यश मिळवले. या दोघांना जे धन मिळाले ते त्यांनी सत्कारणी लावले. पहिले सहा दिवस अनुयायांपैकी कुणीकुणी कीर्तने करीत. शेवटच्या दिवशी बाबा तेथे पोहोचत. स्वत: बाबा कीर्तनाचे पटांगण झाडून काढत. त्यांच्या कीर्तनास प्रचंड गर्दी होई, धान्य, पैशाचा जणू पूर वाहू लागे. मध्यरात्र उलटून गेल्यावर कीर्तन संपे. कीर्तनामध्ये विनोदाच्या गोष्टी सांगून लोकांना हसवत. बाबा गाडगेबुवा, मडकेबुवा, लोटकेबुवा, चापरेबुवा, चिंधेबुवा

वगैरे नावांनीही ओळखले जात. ते 'निर्माही' होते. माणसे जोडत तसेच ती तोडतही असत. ते निःसंग, विरक्त होते.

पत्रव्यवहार :-

बाबा निरक्षरहोते; पण त्यांचा पत्रव्यवहार फार मोठा होता. त्यांनी लिहून घेतलेली अक्षरशः हजारो पत्रे महाराष्ट्रभर उपलब्ध आहेत. त्यातील आपलेली आहेत. बहुधा सर्वच पत्रे कामासंबंधी असत. पत्रे गो. नी. दांडेकर यांच्या 'श्री गाडगे महाराज' या ग्रंथात काम दारूबंदी, अस्पृश्यता निवारण, कर्जमुक्ती इत्यादी विषयांवर बाबा कीर्तनाच्या माध्यमातून फार मोठी जागृती करत. त्यांना प्रवास करावा लागे. म्हणून १९४८ मध्ये शासनाने त्यांना गाडी दिली होती. त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बाळासाहेब खेर होते. नाईक निंबाळकर व गणपतराव यांच्या आग्रहाखातर त्यांनी के गाडी स्वीकारली. ये हे तेव्हा मंत्री होते

कुष्ठरोग्यांची सेवा :-

गाडगे महाराजांच्या मनी कुष्ठरोग्याविषयी कळवळा होता. आळंदी येथे त्यांनी एका महारोग्याला उचलून घेतले व त्याचे शरीर पाण्याने धुऊन काढले. अमरावती येथे डॉ. शिवाजीराव पटवर्धनाच्या श्री जगदंबा निवासात ते राहत असत व कुष्ठरोग्यांसमोर कीर्तन करीत असत. नगरच्या मेहेरबाबांच्या आश्रमासही ते भेट देत असत व कुष्ठरोग्यांची सेवा करत. कुष्ठरोग झाला की आई-बाप, बहीण भाऊ, मुलगा-मुलगी व पत्नीही त्याला टाकून देते ही बाब दुर्दैवी होय, असे ते म्हणत.

बाबांनी आयुष्यभर प्रवास केला. कोणाच्याही घरी ते मुक्काम करीत नसत. भाकरीचा तुकडा ते मागून घेत व त्यावरच गुजराण करीत. तीन-तीन तास ते खड्या आवाजात कीर्तन करीत. कीर्तनासाठी त्यांना साहित्य, टाळ, वीणा काहीच लागत नसे. अत्यंत सोप्या, बाळबोध, ओघवत्या भाषेत ते बोलत. 'गोपाला गोपाला । देवकीनंदन गोपाला' हे त्यांचे आवडते भजन. अगदी वयाच्या ७५ व्या वर्षदेखील ते दोन तास उभे राहून कीर्तन करत,बाबांनी कर्जे काढून देवयात्रा करणारांचा त्यांनी निषेध केला. हुंड्याविरुद्ध आवाज उठविला. देव देवळात नाही. तो भूतमात्रामध्ये आहे हे त्यांनी आवर्जून सांगितले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात काळाबाजार करणारांना ते कानपि क्या देत. गरजा व व्यसने कमी करा असा सल्ला ते देत असत. मृत व्यक्तींची हाडे गंगेत टाकली काय किंवा गटारात टाकली काय, काही फरक फडत नाही, असे ते म्हणत. डॉ. पंजाबराव देशमुख मंत्री झाल्यावर त्यांचा सत्कार बाबांनी घडवून आणला होता. सध्या अमरावती येथील विद्यापीठास त्यांचे नाव दिलेले आहे.

आजच्या काळातील संदर्भ

आजही गाव पातळीवरील स्वच्छता अभियान, अंधश्रद्धा निर्मूलन , शैक्षणिक संस्था, ग्रामउत्थान योजना या सर्व क्षेत्रांवर संत गाडगे महाराजांचा प्रभाव जाणवत राहतो. सरकारी कार्यक्रमांमध्ये त्यांची विचारधारा अंतर्भूत आहे.

त्यांचा श्रमदानाचा संदेश शाश्वत असून “सेवा हीच उपासना” ही संकल्पना आजच्या विकास मॉडेलसाठी आदर्श आहे.

निष्कर्ष :

संत गाडगे महाराज हे केवळ संत नव्हते, तर व्यावहारिक समाजसुधारक, परिवर्तनवादी विचारवंत आणि कृतीशील मार्गदर्शक होते. त्यांचे कार्य मानवधर्म, सेवा, स्वच्छता, शिक्षण आणि तर्कशीलता यांवर आधारित असल्याने आजही ते समाजासाठी दिशादर्शक आहेत. त्यांच्या विचारसरणीमुळे भारतीय ग्रामीण समाजाच्या मानसिकतेत बदल घडून आला.

त्यांच्या जीवनाचे सार म्हणजे–

“श्रद्धेपेक्षा सेवा श्रेष्ठ, कर्माचाच खरा धर्म”

संदर्भ ग्रंथसूची

1.बापट, य. गो. संत गाडगे महाराज. पुणे: कॉन्टिनेन्टल प्रकाशन, 2008.

2.काळे, रमेश. संत गाडगे बाबा चरित्र आणि कार्य. नागपूर: लोकवाङ्मय गृह, 1999.

3.पवार, सुहास. महाराष्ट्रातील समाजसुधारक. मुंबई: साहित्य संगम, 2012.

4.देशमुख, प्रा. एन. एस. गाडगे महाराजांचे सामाजिक कार्य. अमरावती विद्यापीठ, संशोधन निबंध, 2005.

५.गो. नी. दांडेकर श्री गाडगे महाराज, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, नववी आवृत्ती

६.मधुकर केचे - श्रीसंत गाडगे महाराज १९) लोकसाहित्यिक अण्णा भाऊ साठे (इ.स. १९२०-१९६८)